# वसई विकास सहकारी बँक लि., वसई, जिल्हा: पालघर

मुख्य कार्यालय: चिमाजी अप्पा मैदानासमोर, बस डेपो जवळ, वसई (प.), जिल्हा पालघर – ४०१ २०१

---

**जाहिरात कोड क्र. १२८/२०२५-२६**

महाराष्ट्र राज्यातील पालघर जिल्ह्यातील अग्रगण्य असलेल्या **वसई विकास सहकारी बँक लि., वसई, जिल्हा पालघर** मध्ये **'Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade)'** या पदाकरिता दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशन लि., मुंबई यांचे माध्यमातून ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून इच्छुक उमेदवारांनी आपली संपूर्ण माहिती भरलेले अर्ज गुरुवार दि. ०५/०२/२०२६ पासून सकाळी ११.०० वाजल्यापासून ते गुरुवार दि. १९/०२/२०२६ पर्यंत रात्री ११.५९ मिनिटांपर्यंत ऑनलाईन पद्धतीनेच सादर करावेत. पदाचा तपशील आणि महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत:

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी | दि. ०५/०२/२०२६ सकाळी ११.०० पासून ते दि. १९/०२/२०२६ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| २ | परीक्षा शुल्क तथा अर्ज शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरण्याचा व संकेतस्थळावर अद्ययावत करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १९/०२/२०२६ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| ३ | परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | http://www.mucbf.in/ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ४ | मुलाखत दिनांक | http://www.mucbf.in/ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |

## महत्वाच्या सूचना

१) परीक्षा शुल्क तसेच अर्ज शुल्क संकेतस्थळावर अद्ययावत केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही.

२) उमेद्वाराकडे वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक असावा, जो निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध आणि सक्रिय राहिला पाहिजे. तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेद्वारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेद्वाराची राहिल. तसेच ई-मेल आय.डी. व संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना फेडरेशन व बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान फेडरेशनच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अवलोकन करुन भरतीप्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेद्वाराची राहील.

www.govnokri.in

३) उमेद्वारांनी अर्ज भरताना सदर पदासाठी आवश्यक पात्रता धारण करीत असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा. उमेद्वारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रके, अन्य प्रमाणपत्रके व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि घेण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान सर्व प्रमाणपत्र/कागदपत्र यांची सखोल छाननी करण्यात येईल. त्यामुळे ऑनलाईन अर्जामध्ये उमेद्वाराने त्याचे पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास, त्रुटी राहिल्यास किंवा अर्ज अपूर्ण राहिल्यास तसेच भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेद्वाराची राहील. अशा परिस्थितीत फेडरेशनने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल व सदर निर्णय संबंधित उमेद्वारास मान्य असेल तसेच याबाबत उमेद्वारास कोठेही व कोणत्याही प्रकारे तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यावर बदलता येणार नाही.

४) सदर भरती प्रक्रियेदरम्यान संकेतस्थळावर असलेल्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन व पालन करुन भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेद्वाराची राहील.

५) इच्छुक उमेदवारांनी अर्जातील माहिती पूर्ण भरुन वैध ई-मेल ॲड्रेससह जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत सदर अर्जाची ऑनलाईन पद्धतीने दि. १९/०२/२०२६ पर्यंत रात्री ११:५९ वाजेपर्यंत नोंदणी करावी. त्यानंतर आलेल्या अथवा अर्जासोबत परीक्षा शुल्क/अर्ज शुल्क न भरणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade) पदाकरिता उमेद्वारांची १०० गुणांची बहुपर्यायी प्रश्नांची ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येईल.

६) Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade) पदाकरिता उमेद्वाराची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रकांची पूर्व तपासणी/छाननी न करता घेण्यात येणार असल्याने, या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेद्वारांना निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. या परिस्थितीत उमेद्वारास मिळालेले गुण तसेच प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान कागदपत्रकांच्या पूर्ण छाननी व तपासणीनंतरच त्यांची वैधता विचारात घेऊन उमेद्वाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत उमेद्वार कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेद्वारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार फेडरेशनने व संबंधित बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेद्वारांना मागाहून कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७) उमेद्वारांना ऑफलाईन परीक्षा/कागदपत्रके पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेद्वारांची बँकेमार्फत प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल. त्यानंतर परिक्षेत प्राप्त झालेले गुण व मुलाखतीतील गुण यांची एकत्रित बेरीज करुन, त्या आधारे उमेद्वारांची निवड करण्यात येईल.

९) अर्ज करणाऱ्या कोणत्याही उमेद्वारास परीक्षा शुल्क (अर्ज शुल्कासह) परत दिले जाणार नाही.

www.govnokri.in

१०) Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade)पदाकरिता परीक्षेची वेळ उमेद्वारांना ई-मेल/एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. तसेच फेडरेशनच्या संकेतस्थळावर http://www.mucbf.in/ देखील प्रसिद्ध करण्यात येईल.

११) मुलाखतीचे वेळापत्रक उमेद्वारांना ई-मेल/एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. तसेच फेडरेशनच्या संकेतस्थळावर http://www.mucbf.in/ देखील प्रसिद्ध करण्यात येईल.

१२) उमेद्वाराने अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असावा. सदर माहिती अथवा तपशील चूकीचा अथवा खोटा आढळल्यास सदर उमेद्वाराचा अर्ज नोकरभरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१३) भरती प्रक्रियेत/निवड कार्यपद्धतीत अपरिहार्य परिस्थितीत किंवा आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार फेडरेशन व संबंधित बँकेस असेल. अशा प्रकारच्या कोणताही बदलाबाबतची माहिती ही संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच अपवादात्मक परिस्थितीत ४८ तासांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असल्यास, उमेद्वारांना एसएमएस व फोन कॉल्सच्या माध्यमातून माहिती देण्यात येईल.

१४) सदर जाहिरातीमध्ये नमूद पदांची संख्या गुणवत्तेनुसार विचारात घेऊन, अंशत: भरती करण्याचा अधिकार संबंधित बँकेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१५) उमेद्वाराने अर्ज अपूर्ण भरल्यास अथवा विहित कालावधीत भरुन न पाठविल्यास सदर उमेद्वार परीक्षेस अपात्र राहील. तसेच संबंधित उमेद्वाराची कोणत्याही प्रकारे भरलेल्या शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.

१६) Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व मुलाखत प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेद्वारांनी बँकेत रुजू होताना सुरुवातीच्या ०२ वर्षांच्या सेवाकालावधीकरिता सर्विस बॉण्ड सादर करणे बंधनकारक राहील.

१७) सदर बॉण्ड हा एकूण रु. २,००,०००/- चा हमी बॉण्ड असेल.

१८) सर्विस बॉण्ड अंतर्गत उमेद्वाराने खालीलप्रमाणे रक्कम बँकेत जमा करणे आवश्यक राहील:

अ. रु. ५०,०००/- ही रक्कम संबंधित बँकेत दोन वर्ष मुदत ठेव म्हणून ठेवावी लागेल. सदर मुदत ठेवीवर बँकेचा बोजा (लिन) राहील. सदर मुदत ठेवीवर संबंधित कर्मचाऱ्यास कोणतेही कर्ज देण्यात येणार नाही.

आ. उर्वरित रु. १,५०,०००/- रक्कम हमी बॉण्ड स्वरुपात राहील.

१९) सदर सर्विस बॉण्ड उमेद्वाराने स्वत: सही करुन दोन साक्षीदारांच्या सहीने नोंदणीकृत नोटरीकडून नोटराईज्ड करुन सादर करणे आवश्यक राहील.

www.govnokri.in

२०) संबंधित उमेद्वाराने ०२ वर्षांच्या सेवाकालावधीपूर्वी, जरी ०३ महिन्यांची पूर्वसूचना देऊन बँकेचा राजीनामा दिला तरी:

अ. बँकेत ठेवलेली रु. ५०,०००/- ची मुदत ठेव जप्त करण्यात येईल.

आ. हमी बॉण्डनुसार उमेद्वाराने उर्वरित रु. १,५०,०००/- बँकेस अदा करणे बंधनकारक राहील.

२१) बँकेत प्रत्यक्ष रुजू होताना पात्र उमेद्वारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीयदृष्ट्या तंदरुस्त उमेद्वारांनाच नियुक्तीपत्र देण्यात येईल.

२२) Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade) पदाच्या भरतीबाबत फेडरेशनची नियुक्ती बँकेने केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणे, ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेणे व परीक्षेचा निकाल जाहीर करणे इ. पर्यंतच कामे पार पाडणेकरिता केलेली आहे, याची सर्व उमेद्वारांनी नोंद घ्यावी.

२३) जर एखाद्या परीक्षार्थीची वर्तणूक परीक्षाकक्षात परीक्षा देतेवेळी संशयास्पद आढळल्यास अथवा त्याने गैरमार्गाचा वापर केल्याचे आढळल्यास व असा परीक्षार्थी जर गुणवत्ता यादीत येत असेल, तर त्याची फेरपरीक्षा घेण्याचे अधिकार फेडरेशन राखून ठेवत आहे.

अ. **पदाचे नाव: Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade)**

**एकूण पदे:** १९

**नोकरीचे ठिकाण:** पालघर/ठाणे/मुंबई जिल्हा किंवा बँकेच्या कोणत्याही व्यवसायाच्या ठिकाणी किंवा व्यवस्थापनाच्या आवश्यकतेनुसार, उमेद्वाराची सेवा सध्याच्या किंवा भविष्यातील कोणत्याही शाखेत किंवा कार्यालयात हस्तांतरित करण्याचा अधिकार बँकेकडे राखून ठेवलेला आहे.

**अर्ज करावयाची पद्धत:** ऑनलाईन

**वयोमर्यादा:** दि. ३१/१२/२०२५ रोजी किमान २२ ते कमाल ३५ वर्षे

**शैक्षणिक अर्हता (अनिवार्य):**

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी
२. MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक (equivalent certification course)
३. दि. ३१/१२/२०२५ रोजी शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेद्वार अर्ज करण्यास पात्र असतील.

www.govnokri.in

४. परीक्षेचा निकाल जर फक्त विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवर अद्ययावत केला गेला असेल किंवा वेब-आधारित प्रमाणपत्र प्रदान केले गेले असेल, तर उमेद्वाराने त्यासंदर्भात मूळ प्रमाणपत्र बँकेला सादर करणे आवश्यक राहील आणि त्यावर विद्यापीठाच्या अधिकृत अधिकाऱ्याने सदरहू उमेद्वार परीक्षेत उत्तीर्ण झाल्याची तारीख दर्शवून स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

**प्राधान्य:**

१. JAIIB/CAIIB/GDC&A उत्तीर्ण तसेच शासन मान्यता प्राप्त इतर संस्थेची (ICM, IIBF, VAMNICOM इ.) बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका
२. बँका/पतसंस्था किंवा इतर वित्तीय संस्थांमधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
३. महाराष्ट्र राज्यातील पालघर/ठाणे/मुंबई जिल्ह्यात राहत असलेल्या उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल.

**अट:**

बँकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी काम करण्याची तयारी.

**भाषेचे ज्ञान:**

मराठी/इंग्रजी/हिंदी भाषा लिहिण्यामध्ये व बोलण्यामध्ये प्रभुत्व असावे.

**वेतन:**

**(अ) पदाचे नाव: Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade)**

१. **प्रथम** वर्षाकरिता वेतन दरमहा रु. १५,०००/- (एकत्रित)
२. **द्वितीय** वर्षाकरिता वेतन दरमहा रु. १८,०००/- (एकत्रित)

**(ब) पदाचे नाव: Junior Clerk – Marketing & Operations**

३. **तृतीय** वर्षापासून (नोकरीच्या कामकाजातील प्रगती नुसार):
वेतन: बँकेच्या धोरणानुसार कनिष्ठ लिपीक संवर्गाला लागू असलेल्या वेतन श्रेणीप्रमाणे उमेद्वारास कायम करण्यात येईल.

**वेतनश्रेणी:**

४३०-४५/२, ५२०-५५/१, ५७५-६५/२, ७०५-१०५/८, १५४५-१२५/३, १९२०-१५०/३, २३७०-१७५/३, २८९५-२०५/३, ३५१०-२४०/९, ५६७० – ३५ वर्षे

www.govnokri.in

**निवड कार्यपद्धती:**

**१. ऑफलाईन परीक्षा :**

Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade) पदाकरिता १०० गुणांची इंग्रजी व मराठी भाषेतून बहुपर्यायी स्वरुपाची लेखी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येईल. बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांमध्ये संख्यात्मक आणि गणिती क्षमता, इंग्रजी भाषा आणि व्याकरण, संगणक आणि सहकार ज्ञान, बौधिक चाचणी, बँकिंग आणि सामान्य ज्ञान या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल. तद्नंतर १०० पैकी प्राप्त गुणांचे ९० च्या गुणोत्तरामध्ये रुपांतर करण्यात येईल. सदर पदाकरिता घेण्यात येणाऱ्या ऑफलाईन परीक्षेचे स्वरुप पुढीलप्रमाणे असेल:

| अ. क्र. | परीक्षेचा विषय | परीक्षेची भाषा | एकूण प्रश्न | एकूण गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | संख्यात्मक आणि गणिती क्षमता | इंग्रजी व मराठी | ४० | ४० | १२० मिनिटे |
| २ | इंग्रजी भाषा आणि व्याकरण | इंग्रजी | २० | १० | |
| ३ | संगणक आणि सहकार ज्ञान | इंग्रजी व मराठी | २० | १० | |
| ४ | बौधिक चाचणी | इंग्रजी व मराठी | २० | २० | |
| ५ | बँकिंग आणि सामान्य ज्ञान | इंग्रजी व मराठी | २० | २० | |
| | **एकूण** | | **१२०** | **१००** | |

**२. कागदपत्रके पडताळणी:**

उमेद्वारास ऑफलाईन परीक्षेतील गुणांच्या उतरत्या क्रमवारीनुसार १:३ या प्रमाणात बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपूर्वी शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रकांची प्राथमिक कागदपत्रके पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. त्यावेळी उमेद्वाराने मूळ कागदपत्रके उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रके पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेद्वारास बँक धोरणाप्रमाणे बँकेकडून मुलाखतीस बोलविण्यात येईल.

**३. मुलाखत:**

Customer Service Representative (CSR) – Marketing and Operations (Clerical Grade)पदाकरिता उत्तीर्ण होणाऱ्या उमेद्वारांना बँकेच्या धोरणानुसार भरावयाचे पदसंख्येच्या प्रमाणात ऑफलाईन परीक्षेच्या गुणानुक्रमे प्रत्यक्ष मौखिक मुलाखतीस बोलविण्यात येईल. मौखिक मुलाखतीकरिता १० गुण (शैक्षणिक पात्रतेकरिता ५ गुण व प्रत्यक्ष मौखिक मुलाखतीकरिता ५ गुण) राहतील. मुलाखतीस गैरहजर राहिल्यास संबंधित उमेद्वार अंतिम निवडीस (परीक्षेत उत्तीर्ण झालेला असला तरी) पात्र राहणार नाही.

www.govnokri.in

४. **उमेद्वाराची अंतिम निवड सूची:**

उमेद्वाराचे ऑफलाईन परीक्षेतील गुण अधिक मुलाखतीचे गुण यांची बेरीज करून एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल व सदर सूची फेडरेशनच्या व बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

**परीक्षेचे स्थळ: वसई**

**परीक्षा शुल्क (अर्ज शुल्कासह):**

१. परीक्षा शुल्क (अर्ज शुल्कासह) रु. ९५०/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण रु. १,१२१/- + Applicable Bank Charges (विना परतावा) (Online Payment)

२. उमेद्वारांना अर्ज भरतांना अडचणी/शंका असल्यास संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करुन अडचणी/शंकांचे निरसन करावे.

*****

www.govnokri.in